एक उद्धट व्यक्ती

इद्रिस शाह

मराठी: अश्विनी बर्वे



ही गोष्ट एका उद्धट माणसाची आहे जो इतरांशी वाईट वागत असे आणि एका हुशार मुलाची आहे जो त्याचे वर्तन बदलण्यासाठी एक योजना आखतो. गावकऱ्यांच्या मदतीने तो मुलगा आपल्या योजनेत यशस्वी होतो.

ही गोष्ट मुलांचे केवळ मनोरंजनच करणार नाही, तर संघर्ष सोडवण्यासाठी नेतृत्व आणि परस्पर सहकार्य किती महत्त्वाचे आहे हे देखील त्यांना शिकवेल.




एक उद्धट व्यक्ती

इद्रिस शाह




मराठी: अश्विनी बर्वे


फार पूर्वी, हजारो वर्षांपूर्वी,
पक्षी उलटे उडत असत, कुठेतरी एक गाव होते.



गावात प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे घर होते आणि स्वतःचे एक शेतही होते आणि त्या शेतात ते बटाटे, गाजर, कोबी आणि इतर प्रकारची पिके घेत असत.

आता त्या गावात राहणारे सर्व लोक खूप सभ्य आणि सुसंस्कृत होते, फक्त एक माणूस वगळता जो खूप उद्धट होता.






जेव्हा कोणी त्या उद्धट माणसाला 'शुभ दिवस' म्हणायचे, तेव्हा तो उलट शिवीगाळ करायचा. आणि जेव्हा कोणी 'शुभ संध्या' म्हणायचे, तेव्हाही तो त्यांना घाणेरड्या भाषेत चिडवायचा.

त्याच्या वागण्यामुळे लोक चिडायचे आणि म्हणायचे, 'तू इतकं उद्धटपणे का वागतोस?'



पण तो नेहमी बडबड करत असे आणि वाईट गोष्टी बोलून सर्वांचा अपमान करत असे.



बऱ्याच काळापर्यंत, लोकांनी त्याच्या वाईट वागणुकीकडे फारसे लक्ष दिले नाही. त्यांना चांगले आणि वाईट संस्कार काय असतात हे माहीत होते आणि ते अनेकदा त्या उद्धट माणसाकडे फारसे लक्ष देत नसत.

पण नंतर त्याचे वागणे अधिकच बिघडले. दररोज रात्री तो घरातून बाहेर येऊन वेगवेगळ्या घरांसमोर उभा राहायचा आणि रिकामे डबे ठोकत भयंकर आवाज करायचा.

ठक! ठक! ठक!

लोक झोपेतून जागे होत असत. ते खिडक्या उघडून बाहेर बघत आणि म्हणत, "हा एवढा गोंधळ कशासाठी आहे?"

बॉक्सवर आणखी जोरात फटके मारत असे. .

धड! धड!


धड! धड!

धड! धड!

त्याच्यासोबत काय करावे हे लोकांना समजत नव्हते.



एके दिवशी, तो उद्धट माणूस आपल्या मित्रांसोबत राहण्यासाठी दुसऱ्या गावात गेला. तो निघून गेल्यावर गावातील लोकांना इतका आनंद झाला की, त्याला निरोप देण्यासाठी ते जमले.




या लोकामध्ये एक हुशार मुलगाही होता.

तो उद्धट मुलगा दिसेनासा होताच, तो हुशार मुलगा एका खोक्यावर उभा राहिला आणि मग त्याने सर्वांना जवळ यायला बोलावले.

जेव्हा लोक जवळ आले, तेव्हा तो हुशार मुलगा म्हणाला, ‘मला त्या उद्धट माणसाविषयी तुमच्याशी बोलायचे आहे.’





सर्वजण एकत्र बोलू लागले.

ही ईश्वरी कृपा आहे.

हो, तो गेला आहे.

तो गेला आहे.

खूप छान वाटतंय.

आम्ही त्याच्याबद्दल का बोलत
आहोत. का बोलू?

“तुझं बरोबर आहे,” एक वृद्ध स्त्री
म्हणाली “तो परत येईल आणि
पु”न्हा तसाच आपल्याला त्रास देईल!”

हो, खरंच.
एक वृद्ध
माणूस
म्हणाला.

“पण तो
नक्की परत येईन!
हुशार मुलगा म्हणाला.



‘आपण काय करू शकतो?’ लोक ओरडले.

"माझ्या मनात एक योजना आहे," तो हुशार मुलगा म्हणाला. "आपण त्याला त्याचे वर्तन बदलायला भाग पाडू शकू असा एक मार्ग मी शोधला आहे.”

‘आम्हाला आता सांग!’ लोक ओरडले.

"ऐका," तो हुशार मुलगा म्हणाला. "त्या उद्धट माणसाच्या शेतात त्याने बटाटे लावले आहेत . तो गावाबाहेर गेला असताना, आपण सगळे बटाटे उपटून त्यांच्या जागी गाजरं लावू."



मग जेव्हा तो परत येईल, तेव्हा त्याला वाटेल की ही शेती त्याची नाही आणि हे गावही त्याचे नाही.


"त्याच्या घराचं काय होईल?" म्हातारीने विचारले. "तो घरी जाईल आणि त्याला समजेल की हे गाव त्याचं आहे, कारण तो आपलं घर ओळखेल."

"त्याचं घर लाल आहे," हुशार मुलगा म्हणाला. "आपण त्याला हिरवा रंग दिला तर त्याला वाटेल की हे वेगळंच घर आहे."

‘पण तो घरात गेला तर काय?’ म्हातारीने विचारले.



'मी त्यावरही उपाय शोधला आहे,’
असे हुशार मुलगा म्हणाला.



सगळी मांडणी वेगळ्या पद्धतीने करू. मग त्याला नक्कीच वाटेल की हे दुसऱ्या कोणाचं तरी घर आहे.


‘याने आपल्याला काय मिळणार?’ असा प्रश्न अनेकांनी विचारला.

"अहो," तो हुशार मुलगा म्हणाला. "तो एकतर निघून जाईल किंवा त्याला आपलं वागणं बदलावं लागेल."

"मला तसं वाटतं," म्हातारी म्हणाली. "हे कदाचित उपयोगी पडेल."


सर्वजण एकत्र जमले आणि त्यांनी जोमाने कामाला सुरुवात केली. त्यांनी त्या माणसाचे सर्व बटाटे खणून काढले आणि त्या जागी शेतात गाजरे पुरली.

त्यांनी त्याच्या घराबाहेरच्या भिंतींना नवीन रंग दिला.





त्यांनी घरातील भिंतींना वेगळा रंग दिला. त्यांनी फर्निचरला रंग दिला आणि सर्व गोष्टींची अशी मांडणी केली की ते एक वेगळेच घर वाटावे.




थोड्याच दिवसात तो उद्धट माणूस परत आला. गावात आल्यावर तो पुन्हा भेटलेल्या प्रत्येकाला शिवीगाळ करू लागला. आणि मग तो जोरात पत्र्याचे डबे आपटू लागला. धड! धड! धड!

लोक त्याच्याभोवती जमले आणि तो हुशार मुलगा म्हणाला, "नमस्कार! तुम्ही कोण आहात?"

"मी कोण आहे हे तुला माहीत आहे," तो उद्धट माणूस म्हणाला.

बॉक्सला घंटा वाजवत तो म्हणाला,





‘अरे नाही, आम्हाला माहीत नाही!’ लोक म्हणाले.

"हो, तुम्हाला माहीत आहे! हे माझं बटाट्याचं शेत आहे," तो माणूस आपल्या शेताकडे बोट दाखवत म्हणाला.

"पण या शेतात गाजरं आहेत," जमिनीतून एक गाजर उपटत तो हुशार मुलगा म्हणाला. "हे तुझं शेत असू शकत नाही."

‘पण माझं घर तिकडे आहे!’ तो माणूस म्हणाला.

‘तुमच्या घराचा रंग कोणता आहे?’ त्या हुशार मुलाने विचारले.

'माझं घर लाल आहे हे तुम्हाला चांगलंच माहीत आहे,' तो माणूस म्हणाला.





'पण ते घर हिरवं आहे,' हुशार मुलगा म्हणाला.

त्या माणसाने आपल्या घराकडे खूप काळजीपूर्वक पाहिले आणि म्हणाला,

अरे देवा, हे घर हिरवं आहे.,मग तो खिडकीकडे धावत गेला आणि त्याने घरात डोकावून पाहिले, तेव्हा त्याला आढळले की सर्व काही नवीन आणि अनोळखी होते .

"अरे," तो माणूस डोके खाजवत म्हणाला. "कदाचित मी या गावातला नाही."

त्याने आपल्या सभोवताली उभ्या असलेल्या लोकांकडे पाहिले, मग आपली नजर खाली झुकवली आणि तो अचानक खूप दुःखी झाला. 'पण जर मी या गावचा नसेन, तर मग मी कोणत्या गावचा आहे?'

"हे एक गुपित आहे," तो हुशार मुलगा म्हणाला. "आम्ही तुम्हाला हे गुपित सांगू शकतो , पण एका अटीवर. तुम्ही नेहमी नम्रपणे वागण्याचे, कोणाशीही उद्धटपणे न वागण्याचे आणि सर्वांशी विनम्रपणे बोलण्याचे वचन दिले पाहिजे. जर तुम्ही हे वचन दिले, तर आम्ही तुम्हाला तुमचे गुपित सांगू."



"मी वचन देतो! मी वचन देतो!" तो माणूस म्हणाला. "आता कृपया मला सांगा!"

आणि मग सगळेजण एकत्र म्हणाले, 'आम्ही तुझ्या घराचा बाहेरचा भाग रंगवला.' 'आम्ही तुझ्या शेतात गाजरं लावली.' 'आम्ही घराचा आतला भागही रंगवला.' 'आम्ही तुझ्या फर्निचरलाही नवीन रंग दिला.' 'आणि मग आम्ही ते वेगळ्या पद्धतीने सजवलं.'

"आम्ही हे सगळं तुला धडा शिकवण्यासाठी केलं," तो हुशार मुलगा म्हणाला. "पण आता तू नेहमी चांगलं वागण्याचं वचन दिलं आहेस. आपण पुन्हा सगळं काही बदलू आणि आपण सुखाने एकत्र राहू."

म्हणून त्या उद्धट माणसाने आपले वर्तन बदलण्याचे पुन्हा वचन दिले. त्याने वचन दिले, आणि मग पुन्हा वचन दिले, आणि मग पुन्हा वचन दिले. आणि मग लोकांनी सर्व काही बदलून टाकले.
काही गोष्टी पूर्वीसारख्याच ठेवल्या .



त्या दिवसापासून, जेव्हा कोणी त्याला 'शुभ दिवस' म्हणायचे, तेव्हा तो माणूस आनंदाने म्हणायचा, 'तुम्हालाही शुभ दिवस.'

आणि जेव्हा कोणी त्याला 'शुभ संध्या' म्हणायचे, तेव्हा तोही अत्यंत नम्रपणे 'तुम्हालाही शुभ संध्या' असे म्हणायचा.

आणि त्याने पुन्हा कधीही पत्र्याचे डबे वापरले नाहीत. त्याऐवजी ... आणि मी खरंच त्यानंतर सगळे आनंदी होते . त्या गावात राहत होतो.



समाप्त

